# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ (१) अन्वये झालेली तक्रार

## तक्रार क्रमांक : ८३६/२०२२

**तक्रारकर्ता,** श्री.भरत गणपत बागराव
मु.पो.सोगाव
ता.शहापूर, जि.ठाणे ४२१ ४०३

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक
ग्रामपंचायत कार्यालय सोगाव
ता.शहापूर, जि.ठाणे

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक
ग्रामपंचायत कार्यालय सोगाव
ता.शहापूर, जि.ठाणे

**तक्रार सुनावणीचा दिनांक** : **४/८/२०२५**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज प्राप्त दिनांक | प्रथम अपिल आदेश प्राप्त दिनांक |
|---|---|---|---|
| २३/९/२०२१ | ---- | २/११/२०२१ | २४/१/२०२२ |

तक्रारकर्ता यांनी दि.२१/४/२०२२ रोजीच्या अर्जान्वये " माहिती दिली नाही " असे कारण नमूद करुन कलम १८(१) अन्वये तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रार अर्जावर आज दिनांक ४/८/२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस तक्रारकर्ता उपस्थित आहेत. तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.एस.एस.पवार, ग्रामपंचायत अधिकारी सोगाव उपस्थित आहेत. तत्कालिन जन माहिती अधिकारी श्री.धनराज बाबु शेरावते, सेवानिवृत्त अनुपस्थित आहेत. (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत)

तक्रारकर्ता यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

" *संपुर्ण स्वच्छता अभियान अंतर्गत आलेला एकुण निधी किती, आराखडा व्हावचर फाईल, कॅश बुक, बॅंक पासबुक झेरॉक्ससर्व छायांकित प्रती*"

तद्नंतर तक्रारकर्ता यांनी प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेकडे कलम १९ (१) अन्वये प्रथम अपील दाखल केले.

तक्रारकर्ता यांनी दाखल केलेल्या प्रथम अपीलावर तत्कालीन प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी सुनावणी घेऊन दि.२४/१/२०२२ रोजी, "*अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी आठ दिवसांत अपिलार्थी यांना विनामुल्य सादर करावी.*" असा निर्णय दिलेला आहे.

तक्रारकर्ता यांनी निवेदन केले की, त्यांना अपूर्ण माहिती प्राप्त झाली आहे.

विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी यासंदर्भात खुलासा केला की, त्यांनी कार्यभार स्विकारताना त्यांना संपूर्ण कागदपत्रे प्राप्त झाली नव्हती. त्यामुळे जी कागदपत्रे प्राप्त झाली त्याबाबतची माहिती त्यांनी तक्रारकर्ता यांना दिलेली आहे. आपण पंचनामा करून कार्यभार स्विकारलेला होता. आपल्या पूर्वी कार्यरत असलेले श्री.धनराज शेरावते यांनी आपल्याला योग्यरित्या कार्यभार दिलेला नव्हता.

यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

### आदेश

१. गट विकास अधिकारी, पंचायत समिती शहापूर यांनी या प्रकरणाची संपूर्ण चौकशी करावी व विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.एस.एस.पवार, ग्रामपंचायत अधिकारी सोगाव यांनी पदाचा कार्यभार स्विकारताना त्यांना योग्यरित्या कार्यभार का देण्यात आला नाही, यासाठी कोण जबाबदार आहे, जर कागदपत्रे गहाळ झाले असल्यास त्याबाबत महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम २००५ नुसार काय कार्यवाही केली व यासाठी जबाबदार अधिकाऱ्यांविरूध्द काय कारवाई केली याबाबत सविस्तर शपथपथ पुढील सुनावणीस सादर करावे.
२. प्रस्तुत प्रकरणाची पुढील सुनावणी दि.१७/९/२०२५ रोजी दुपारी २.०० वाजता होईल.

**सही/-**
**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ४ ऑगस्ट, २०२५ .
**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना**
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती शहापूर, शहापूर,
ता.शहापूर जि.ठाणे

## विवेचन

सदर सुनावणीस तक्रारकर्ता उपस्थित आहेत. तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.सुनिल पवार, ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत सोगाव उपस्थित व तत्कालिन जन माहिती अधिकारी श्री.धनराज शेरावते, सेवानिवृत्त ग्रामपंचायत अधिकारी आणि गट विकास अधिकारी, पंचायत समिती शहापूर अनुपस्थित आहेत. (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत)

गट विकास अधिकारी पंचायत समिती शहापूर हे सुनावणीस अनुपस्थित आहेत. दि.४/८/२०२५ रोजीच्या आदेशान्वये गट विकास अधिकारी यांना अहवाल सादर करणेबाबत निर्देशित करणेत आले होते. तथापि त्यांनी अहवाल सादर केला नाही अनुपस्थिती बाबत काहीही कळविले नाही.

यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

## आदेश

१. गट विकास अधिकारी पंचायत समिती शहापूर यांना आयोगाच्या दि.४/८/२०२५ रोजीच्या आदेशानुसार आदेशित केल्यानुसार त्यांनी आपला अहवाल पुढील सुनावणीस स्वत: आयोगासमोर उपस्थित राहून सादर करावा. त्यांना अहवाल सादर करणेसाठी शेवटची संधी देण्यात येत आहे.
२. पुढील सुनावणीस गट विकास अधिकारी, पंचायत समिती शहापूर व जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीस उपस्थित रहावे.
३. प्रस्तुत प्रकरणाची पुढील सुनावणी दि.२७/११/२०२५ रोजी दुपारी २.०० वाजता होईल.

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १५ ऑक्टोबर, २०२५ .
**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना**
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती शहापूर, शहापूर,
ता.शहापूर जि.ठाणे